**सहकारी सूतगिरण्यांना शासकीय भागभांडवल मंजूर करण्याबाबत-**
**पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूरबाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय, शाभाभा-११२४/प्र.क्र.१००/टेक्स-१ (अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ जून, २०२६.

<u>वाचा</u> :-

१. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-२१९३/प्र.क्र.१८६/टेक्स-१, दि.११.८.१९९३.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-११९७/प्र.क्र.१९३/टेक्स-१, दि.२४.०३.१९९९.
३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-३३१६/प्र.क्र.८१/ टेक्स-१(अ), दि.१०.०७.२०१७.
४. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. बैठक-१५१६/प्र.क्र.६०/टेक्स-१(अ), दि.२०.०७.२०१८.
५. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. प्रकल्प-१२१५/प्र.क्र.५०/टेक्स-१(अ), दि.१७.०६.२०२१.
६. शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-३३२१/प्र.क्र.४१/टेक्स-१(अ), दि. ३०.०७.२०२१.
७. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-३३२४/प्र.क्र.२५/टेक्स-१(अ), दि.१४.०८.२०२४.
८. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. प्रकल्प-१२२४/प्र.क्र.७६/टेक्स-१(अ), दि.०४.१०.२०२४.
९.शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/ अर्थ-३,दि. ०७.०४.२०२५, दि.०८.१०.२०२५
१०.आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांचे पत्र क्र. कार्या-६(१)/सूतगि/शा.भा.भा./पूर्णामाय चांदूरबाजार/ ५१२९/ २०२५, दि.०६.१०.२०२५.

**<u>प्रस्तावना</u> :-**

पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या सूतगिरणीची नोंदणी दि.०४.११.२०२३ रोजी करण्यात आली आहे. सदर सूतगिरणीची शासन निर्णय दि.१४.०८.२०२४ अन्वये शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली असून शासन निर्णय दि.०४.१०.२०२४ अन्वये सूतगिरणीच्या रु.८०९०.०० लाख इतक्या किंमतीच्या प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली आहे.

आता, पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूर बाजार, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती ही सूतगिरणी शासन निर्णय दि.३०.०७.२०२१ मधील पहिल्या टप्प्यातील शासकीय भागभांडवल मिळण्याच्या अटींची पूर्तता करीत असल्याने सदर सूतगिरणीस पहिल्या टप्प्यातील शासकीय भागभांडवल रू.१८२०.२५ लाख सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याप्रमाणे पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या. चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या सूतगिरणीस शासन मान्यतेने पहिल्या टप्प्यातील रु.१८२०.२५ लाख इतकी रक्कम शासकीय भागभांडवल म्हणून वितरीत करण्यास पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या सूतगिरणीस मंजूर प्रकल्प अहवालानुसार पहिल्या टप्प्यातील रू.१८२०.२५ लाख इतकी रक्कम शासकीय भागभांडवल म्हणून खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. खुल्या प्रवर्गातील सहकारी सूतगिरण्यांना शासकीय भागभांडवल मंजूर करण्यासाठी "मागणी क्रमांक - व्ही-३, ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना - (००) (०५) सहकारी सूत कताई गिरण्यांना भाग भांडवली अंशदान (४४२५ ०३३८), ३२ अंशदाने" या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२०२७ मध्ये रु.६५८१.२७ लाख इतका निधी अर्थसंकल्पित असून आतापर्यंत या लेखाशीर्षाखालील कोणताही निधी खर्च झालेला नाही. सदर निधीतून पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या सूतगिरणीस रु.१८२०.२५ लाख (अक्षरी रुपये अठरा कोटी वीस लाख पंचवीस हजार फक्त) इतकी रक्कम शासकीय भागभांडवल म्हणून गिरणीचा प्रकल्प उभारण्यासाठी तसेच प्रकल्प अहवालातील अनुज्ञेय तरतुदीपेक्षा त्या त्या बाबींवर होणारा जास्तीचा खर्च गिरणी स्वभागभांडवलातून करील या अटीच्या अधीन राहून मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासकीय भागभांडवल शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-२१९३/प्र.क्र.१८३/टेक्स-१, दिनांक ११.०८.१९९३ व सूतगि-११९७/प्र.क्र.१९३/टेक्स-१, दि. २४.०३.१९९९ मध्ये नमूद केलेल्या (अ.क्र.५ वगळून) अटी व शर्ती, तसेच शासकीय भागभांडवलासंदर्भात शासनाने भविष्यात आणखी काही अटी व शर्ती निश्चित केल्यास अशा अतिरिक्त अटी व शर्ती सदर सूतगिरणीस लागू राहतील या मुद्दयाच्या अधीन राहून तसेच खाली नमूद केलेल्या अतिरिक्त अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) या सूतगिरणींकडून, शासन निर्णय दि.११.०८.१९९३ व दि.२४.०३.१९९९ मधील अटी व शर्तींचे पालन होत आहे, याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी खात्री करावी.

२) शासकीय भागभांडवलाच्या वसुलीबाबत दि.२४.०३.१९९९ रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र.५ मध्ये दि.१०.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार सूतगिरणीने भागभांडवलाचा पहिला हप्ता स्विकारल्यानंतर ५ वर्षांनी किंवा सूतगिरणी सुरु झाल्यानंतर ३ वर्षांनी यापैकी जे आधी घडेल तेव्हापासून उचल केलेल्या भागभांडवलाची परतफेड १/१५ प्रमाणे सुरु करण्यात येईल आणि असे न केल्यास त्यावर दरसाल दर शेकडा १२% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

३) सदर सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन त्याबाबतच्या प्रगतीचा तिमाही अहवाल आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी विहित विवरणपत्रात शासनास सादर करावा.

४) प्रस्तुत गिरणीसंदर्भात शासन निर्णयामधील तरतुदीनुसार वसुलीबाबत काटेकोरपणे कार्यवाही आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी करावी.

५) आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी पुढील ३ महिन्यांत या सूतगिरणीच्या विद्यमान संचालक मंडळाकडून प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत रकमेच्या १०% इतक्या वैयक्तिक मत्तेचे तारण मिळवावे. जोपर्यंत असे वैयक्तिक तारण प्राप्त होणार नाही तोपर्यंत प्रस्तुत वितरीत रक्कम सूतगिरणीस खर्च करता येणार नाही तसेच तोपर्यंत या आदेशाद्वारे मंजूर केलेल्या रकमेवर सूतगिरणीस अधिकर्ष (overdraft) काढून रक्कम खर्च करता येणार नाही, असे बंधन आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी संबंधित बँकेवर घालावे. याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी काटेकोरपणे व तातडीने कार्यवाही करावी.

६) या आदेशानंतर या सूतगिरणीच्या संचालक मंडळाची निवडणूक झाल्यास, नवनियुक्त संचालक मंडळाने शासकीय भागभांडवलाच्या १०% इतके वैयक्तिक मालमत्तेचे तारण भरल्याशिवाय नवीन संचालक मंडळ अस्तित्वात येणार नाही. पुर्वीच्या संचालक मंडळाने काही गैरव्यवहार केला नसेल किंवा त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला नसेल तरच नवनियुक्त संचालक मंडळाने असे तारण दिल्यानंतरच पूर्वीच्या संचालक मंडळाचे वैयक्तिक तारण मुक्त करण्यात येईल, अशी सुधारणा संस्थेच्या By-Laws मध्ये करण्याची कार्यवाही आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी करावी.

७) सूतगिरणीच्या प्रकल्पास मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाच्या Financial Closer चा पुरावा शासनास सादर केल्याशिवाय शासनाचा हिस्सा देता येणार नाही. त्यामुळे त्याबाबतची खात्री आयुक्त वस्त्रोद्योग यांनी करुन घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी.

८) प्रस्तुत सूतगिरणीकडे बँकेत जमा असलेल्या निधीचे नियोजन करुन कार्यक्षमतेने विनियोग करीत असल्याची खात्री आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी करावी.

९) प्रस्तुत सूतगिरणीने शासकीय भागभांडवलाच्या प्रमाणात कर्जाची उचल करुन त्याचा विनियोग प्रकल्प उभारणीसाठी करुन लवकर प्रकल्प पूर्ण करावा. याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी नियंत्रण ठेवावे.

१०) प्रकल्प अहवालात नमूद केल्यानुसार त्या त्या बाबींवर त्या त्या प्रमाणातच गिरणीने खर्च करावा. मंजूर प्रकल्प अहवालापेक्षा जादा होणारा खर्च गिरणीने स्वभागभांडवलातून करावा या अटीवर सदरचे शासकीय भागभांडवल मंजूर करण्यात येत आहे. याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

११) सदर सहकारी सूतगिरण्यांच्या खरेदीबाबत खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे अदा करावी तसेच निविदेमध्ये विवक्षित तरतूद असल्याशिवाय पुरवठादारास अग्रीम अदा करण्यात येऊ नये. याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी खात्री करावी.

१२) गिरणीस प्राप्त झालेल्या भागभांडवलाचा तसेच गिरणीकडे शिल्लक असलेल्या रकमेचा गिरणी योग्य प्रकारे विनियोग करते किंवा नाही याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी नियंत्रण ठेवावे.

१३) सूतगिरणीने भांडवली वस्तु खरेदी करण्यापूर्वी यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची यथास्थित नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात यावी. याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी नियंत्रण करावे.

१४) प्रस्तुत गिरणीने खरेदी केलेल्या वस्तू प्रत्यक्ष प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा करावे. याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी नियंत्रण करावे.

१५) खरेदी विषयक प्रक्रिया उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी.

१६) सूतगिरणीची उभारणी विहित कालमर्यादेत पूर्ण करावी.

१७) गिरणीने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चासंदर्भात, शासन निर्णय, क्रमांक सूतगि-१२००/ ११७१३/ प्र.क्र.४२६/ टेक्स-१(अ), दि.१५.६.२००६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची मान्यता घ्यावी.

१८) सूतगिरणीने मंजूर प्रकल्प अहवालाच्या आकृतीबंधानुसार ५% सभासद भागभांडवल उभारणे बंधनकारक असून सदर सभासद भागभांडवलाची रक्कम सूतगिरणीच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी खर्च करता येणार नाही. तसेच शासनाकडून सूतगिरणीला मंजूर करण्यात येणाऱ्या ४५% शासकीय भागभांडवलाच्या रक्कमेचा विनियोग करताना सूतगिरणीने ५०% रक्कम वित्तीय संस्थेकडून कर्ज म्हणून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. शासकीय भागभांडवलापोटी प्राप्त रक्कमेचा विनियोग करताना वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचाही विनियोग त्याच प्रमाणात करणे गिरणीवर बंधनकारक राहील.

१९) सदर सूतगिरणीच्या सर्व सभासदांनी त्यांचे आधार कार्ड नंबर लिंक करणे बंधनकारक राहील.

४. या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेल्या शासकीय भागभांडवलाची रक्कम रू.१८२०.२५ लाख (अक्षरी रुपये अठरा कोटी वीस लाख पंचवीस हजार फक्त) पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या सूतगिरणीच्या युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा परतवाडा, जि.अमरावती या बँकेच्या खाते क्र.261111010000098, IFSC Code-UBIN08226111 मध्ये RTGS यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात यावी. सूतगिरणीने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चासंदर्भात शासन निर्णय दि.१५.०६.२००६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची मान्यता घ्यावी.

५. सदर सूतगिरणीस मिळालेले अर्थसहाय्य हे गिरणीचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठीच उपयोगात आणणे संस्थेवर बंधनकारक राहील. या अर्थसहाय्याचा दुरुपयोग केल्यास, संस्थेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व संस्थेला दिलेले अर्थसहाय्य एकरकमी वसूल करण्यात येईल. तसेच अशा प्रकरणी संबंधित संचालक मंडळास व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

६. वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं २०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ अन्वये, "३२- अंशदाने" या बाबीखालील खर्च करण्यास वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाली असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीतील अ.क्र.९ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे.

७. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दि.१०.०५.२०१६ मधील परिच्छेद- ब (२) येथे नमूद केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणास विशेष मान्यता प्राप्त झाली असून वित्त विभाग शासन निर्णय दि. ०९.०४.२०२६ सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.९ संदर्भातील तपासणी सुचीमधील असलेल्या मुद्दयांची पूर्तता या प्रकरणी होत आहे.

८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दि.१०.०५.२०१६ मधील परिच्छेद- अ नुसार प्रस्तुत प्रकरणाची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार- वित्त विभाग, परिपत्रक दि. ०९.०४.२०२६ अन्वये “३२ - अंशदाने” या बाबीखाली खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पूर्तता होत आहे.

२) मंजूर निधी:- “मागणी क्र. व्ही-३, ४४२५ - सहकारावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणुका, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (००)(०५) सहकारी सूत कताई गिरण्यांना भाग भांडवली अंशदान (कार्यक्रम), (४४२५ ०३३८), ३२ अंशदाने”" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२०२७ या वर्षासाठी रु.६५८१.२७ लाख इतका निधी अर्थसंकल्पित आहे. आतापर्यंत या लेखाशीर्षाखाली लेखाशीर्षाखाली कोणताही निधी खर्च झालेला नाही.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे:- लागू नाही

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यांत येत आहे, त्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही- या योजनेखाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे- लागू नाही.

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा- सूतगिरणीच्या स्थापत्य बांधकामाच्या निविदांना मंजूरी देण्यासाठी

दि.१६.११.२००२ अन्वये स्थापित व तदनंतर दि.२४.०२.२००५, दि.१५.०६.२००६ व दि.२८.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते.

८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत- सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीबाबत दि.१६.११.२००२ अन्वये स्थापित व तदनंतर दि.२४.०२.२००५, दि.१५.०६.२००६ व दि.२८.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते.

९) खरेदी विषयक प्रक्रिया संबंधित अद्यावत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा- उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ व शासन निर्णय क्र. भांखस २०१७/ प्र.क्र.२०४/उद्योग-४, दि.०८.१२.२०१७ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी, असा उल्लेख या शासन निर्णयामध्ये करण्यात आला आहे.

१०) साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरीत करावी- निविदेमध्ये विवक्षित तरतूद असल्याशिवाय पुरवठादारास अग्रीम अदा करण्यात येऊ नये याबाबत आयुक्त (वस्त्रोद्योग) यांनी खात्री करावी, असा उल्लेख या शासन निर्णयामध्ये करण्यात आला आहे.

९. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रू.१८२०.२५ लाख (अक्षरी रुपये अठ्ठरा कोटी वीस लाख पंचवीस हजार फक्त) इतक्या शासकीय भागभांडवलाचा खर्च "मागणी क्र. व्ही-३, ४४२५ - सहकारावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणुका, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (००)(०५) सहकारी सूत कताई गिरण्यांना भाग भांडवली अंशदान (कार्यक्रम), (४४२५ ०३३८), ३२ अंशदाने" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

१०. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेली रू.१८२०.२५ लाख (अक्षरी रुपये अठरा कोटी वीस लाख पंचवीस हजार फक्त) इतकी रक्कम पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या. चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या सूतगिरणीच्या नावाने अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथून आहरीत करुन सूतगिरणीच्या युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा परतवाडा, जि.अमरावती या बँकेच्या खाते क्र.2611111010000098, IFSC Code-UBIN08226111 मध्ये RTGS द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करण्याकरीता श्री. सु.पु.पांगारकर, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२ यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, श्री. श्रीकृष्ण पवार, उपसचिव (सूतगिरणी), (V०००९), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२ यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय, वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३३१/२०२६/व्यय २ दि.२५.०५.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२३१३०५५९७२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKRISHNA
BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2026.06.23 13:06:55 +05'30'

**(श्रीकृष्ण पवार)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
३. सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (२ प्रतींसह), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अवर सचिव, १७-स/कार्यासन अधिकारी, १६-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. नियोजन विभाग, कार्यासन-१४३१, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०.प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर.
११.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती.
१२.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१३.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१४.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (२ प्रती)
१५.शाखा व्यवस्थापक, युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा परतवाडा, जि. अमरावती
१६.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, वकील हाऊस, मुंबई.
१७.चेअरमन, पूर्णामाय सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती.
१८.निवडनस्ती (टेक्स १- अ).